# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ३९८-२०२४** **दिनांक :- २६/१०/२०२४**

**"सोनसाखळी चोरी करणाऱ्या ०२ सऱ्हाईत आरोपीतांना अवघ्या २४ तासांचे आत अटक करुन, १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.**

दिनांक १८.१०.२०२४ रोजी सकाळी ०५.१५ वा चे सुमारास तक्रारदार श्रीमती. सुनंदा संदिप पवार, वय ५६ वर्ष, हया रस्त्याने कामावर जाण्य़ासाठी डॉन बॉक्स चर्च व आथर्व हाईस बिल्डीगचे समोर मनवेलपाडारोड, विरार पुर्व समोरुन पायी चालत जात असतांना एका मोटार सायकल वरुन २ अनोळखी इसमांनी तक्रारदार यांना शिवीगाळी, धक्काबुक्की करुन, जमीनीवर खाली पाडुन त्यांचे गळयातील ०१ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरीने खेचुन चोरी करुन पळुन गेले. सदरबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. I ७४६/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०९(६), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

मा.वरिष्ठांनी गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. सदर गुन्हयाचा गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी समांतर तपास सुरु करुन घटनास्थळ व परिसरातील अंदाजे ७५ ते ८५ सी.सी.टी.व्ही. कॅमेरांची पडताळणी करुन अनोळखी इसमांचा सातत्याने मागोवा घेतला. सदरचा गुन्हा करणारे अनोळखी इसम हे कातकरी पाडा, चंदनसार रोड, विरार पुर्व या परीसरातील असल्याचे गुप्त बातमीदाराद्वारे माहीती मिळाली. गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या परीसरात पाळत ठेवुन, सापळा रचुन मालमत्ता संदर्भातील अनेक गुन्हे करणारा सऱ्हाईत तडीपार गुन्हेगार १) शंकर हाल्या दिवा वय ३७ वर्षे व त्याचा साथीदार २) राजेश संतोष वाघ वय २१ वर्षे दोन्ही रा. कातकारी पाडा देवकी निवास बंगाल्याजवळ, विरार पुर्व या दोघांना ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांकडे गुन्हयाचे अनुषंगाने केलेल्या तपासात त्यांनी वरील प्रमाणे गुन्हयासह आचोळा, नालासोपारा,माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीत पायी चालणाऱ्या महिलांच्या गळयातील सोन-साखळी चोरीचे गुन्हे केल्याचे तपासात निषन्न झाले आहेत. आरोपीतांकडुन उघडकीस आलेल्या गुन्हयांची माहीती खालील प्रमाणे-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजी नं. व कलम | हस्तगत मालमत्ता |
|---|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ७४६/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०९ (६), ३५२, ३(५) प्रमाणे | ०१ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र |
| २ | आचोळे पोलीस ठाणे | ४२७/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०९ (४), ३(५) प्रमाणे | ०६ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र |
| ३ | नालासोपारा पोलीस ठाणे | ३६४/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०९ (४) प्रमाणे | ११ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र |
| ४ | माणिकपुर पोलीस ठाणे | ३७६/२०२४ भा.न्या.सं.कलम-३०९ (४), ३(५) प्रमाणे | जबरी चोरीचा प्रयत्न |

नमुद आरोपीतांकडे बुध्दी कौशल्यपुर्वक तपास करुन गुन्हयातील जबरी चोरी केलेली १०० टक्के मालमत्ता हस्तगत करुन अथक परिश्रमातुन गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. नमुद गुन्हयाचा तपास श्री. सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोलीस उप निरीक्षक/अविनाश हाटखिळे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, हर्षद चव्हाण, नितेश पाटील, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, उत्कर्ष सोनवणे तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पोहवा/ नामदेव ढोणे, व पोअं/सोहेल शेख यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.




----oooo------